# राजीव गांधी जीवनदायी योजनेसाठी नेत्र रुग्णालयाने नोंदणी करावी–ना.सावंत

**नांदेड :** माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या पुढाकारामुळे राज्यात सुरू झालेल्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत नांदेडसह आठ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेचे निकष पूर्ण करून महापालिका व लॉयन्स क्लबच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या जंगम वाडीतील नेत्र रुग्णालयाने नोंदणी करावी, असे आवाहन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण तसेच वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री व नांदेडचे पालकमंत्री डी. पी.सावंत यांनी केले.

महापालिकेच्या कै. संग्राम पोमदे लॉयन्स नेत्र रुग्णालयात संगणीकृत नेत्र तपासणी सुविधेचा तसेच मोतीबिंदूची जाडी मोजणाऱ्या कॅरोमिटर यंत्रणेचा शुभारंभ त्यांच्या हस्ते झाला त्यावेळी ते बोलत होते. महापौर अजयसिंह बिसेन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी प्रभाग समिती सभापती महेश कनकदंडे, नगरसेवक साबेर चाऊस, सुरेंद्र घोडजकर, लॉयन्स क्लबचे ज्ञानेश्वर महाजन, जयेश ठक्कर आदी उपस्थित होते.

लॉयन्स नेत्र रुग्णालयाने चार महिन्यात चांगलीच सुविधा उपलब्ध करून दिली. याबद्दल समाधान व्यक्त करून पालकमंत्री म्हणाले की, ३०० पैकी २०० दिवस शिबिरे घेण्याचा एक चांगला संकल्प रुग्णालयाने केला आहे. ३०० विविध आजारांसाठी राज्यातील १ लाखाहून कमी उत्पन्न असलेल्या सामान्य नागरिकांकरिता राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरू करण्यात आली असून यात नेत्र शस्त्रक्रियेसारख्या उपचाराची सोय करण्यात आली तर रुग्णांच्या दृष्टीने ते अधिक फायदेशीर ठरेल, असे मत ना.सावंत यांनी मांडले.

महापौर बिसेन म्हणाले की, महापालिकेच्या वतीने दुर्धर आजारासाठी डायलेसीस सेंटर सुरू करण्यासाठी तसेच कमी दरात वैद्यकीय प्रतिपुर्तीची सुविधा उपलब्ध करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. नेत्र रुग्णालयाने वॉर्ड निहाय तपासणी शिबिरे ठेवावीत, सर्व नगरसेवक त्याला सहकार्य करतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्रास्ताविकात लॉयन्स क्लबचे लक्ष्मण संगेवार म्हणाले की, चार महिन्यात नेत्र रुग्णालयात ३४५० रुग्णांची तपासणी करण्यात आली असून ग्रामीण भागातील १७ शिबीरांमध्ये ४८६० रुग्णांची तपासणी केली आहे. रुग्णालयात आतापर्यंत एकूण १०९ शस्त्रक्रिया झाल्या असून यातील तब्बल ३० शस्त्रक्रिया शुक्रवारी (दि.९ ) या एकाच दिवशी करण्यात आल्या आहेत. नित्यानंद मय्या यांनी कार्यक्रमाचे आभार मानले.